पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिति

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक - १९/११/२०१४ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १९/११/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - **सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. मोटे किरण बाळासाहेब
५) मा. सुपे आशा रविंद्र
६) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

या शिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. २) ब्लेझर खरेदी करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३) धनुर्विद्या व सायकलिंग या खेळांचा क्रीडा धोरणातील खेळाडू दत्तक योजनेत समावेश करणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ४) महापौर चषक कुरेश स्पर्धा २०१४-१५ आयोजनाबाबत - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ५) जिल्हास्तर कॅरम स्पर्धा आयोजित करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ६) जिम साहित्य मिळणेबाबत - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ७) थेरगांव बोट क्लब येथील उद्यानातील व्यायाम शाळा चालविण्यास देणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ८) मतिमंद व अपंग दिनानिमित्त मनपा परिसरातील मतिमंद व अपंग विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ९) महापौर चषक राज्यस्तरीय कयाकिंग व कनीईंग बोट स्पर्धा २०१४-१५ आयोजनाबाबत - मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - १

दिनांक - १९/११/२०१४ विभाग - क्रीडा विभाग

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५५०/२०१४, दि.१०/११/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

ई निविदा नोटीस क्र.१/५/२०१३-१४ मा.आयुक्त निवास जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड यांना मा.आयुक्त निवास जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज देणेकामी १ल्या वर्षात दरमहा र.रु.१२,५००/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.१,५०,०००/- इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु. २०,०००/- प्रमाणे १२ महिन्यांकरिता र.रु.२,४०,०००/- इतका असा एकूण र.रु.३,९०,०००/- चे खर्चास व करारनामा करुन दोन वर्षाचे कामाचे आदेश देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी दुस-यावर्षीचे दरासाठी १ल्या वर्षाचा दर र.रु.१२,५००/- यामध्ये दुस-या वर्षासाठी १५% दरवाढ देऊन (र.रु.१,८७५/-) देऊन दुस-यावर्षी दरमहा र.रु.१४,३७५/- या दराने १२ महिन्यांकरीता र.रु.१,७२,५००/- असे एकूण र.रु.३,२२,५००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - २
दिनांक - १९/११/२०१४
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ : मा.सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

मनपाच्यावतीने दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. सदर स्पर्धेत उपस्थित रहाणेकामी मा.क्रीडा समिती सदस्य, क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा विभाग संबंधित अधिकारी यांकरीता अंदाजे ३० ब्लेझर खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ३
दिनांक - १९/११/२०१४
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.किरण मोटे
संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरातील बरेच होतकरु विद्यार्थी धनुर्विद्या व सायकलिंग या खेळामध्ये प्राविण्य मिळवून ते विविध राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भाग घेऊन पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक वाढवित आहेत. परंतु नुकत्याच ठरविणेत आलेल्या पिंपरी चिंचवड मनपाच्या क्रीडा धोरणामधील खेळाडू दत्तक योजनेत वरील खेळांचा समावेश नाही. त्यामुळे या क्रीडा प्रकारातील खेळाडूंना मनपाकडून कुठल्याच सोई सुविधा मिळत नाही. त्यामुळे धनुर्विद्या व सायकलिंग खेळ खेळणा-या खेळाडूंवर अन्याय होत आहे. तरी धनुर्विद्या व सायकलिंग या खेळांचा समावेश क्रीडा धोरणातील खेळाडू दत्तक योजनेत समाविष्ट करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका समितीकडे शिफारस करणेस येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ४

दिनांक - १९/११/२०१४

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्यावतीने सब ज्युनिअर, ज्युनिअर गटाच्या महापौर चषक कुरेशी स्पर्धा २०१४-१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.६,७७,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ५

दिनांक - १९/११/२०१४

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

जिल्हास्तर कॅरम स्पर्धा आयोजित करणेकामी पिंपरी चिंचवड मनपाच्या मार्फत ८ ट्रॉफीज, १० सन्मानचिन्हे देणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - ६

दिनांक - १९/११/२०१४

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक ६३ येथील मनपाच्या मालकीच्या स्मशानभूमी शेजारील मोकळया हॉलमध्ये जिम साहित्य उपलब्ध करुन व्यायामशाळा तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - ७

दिनांक - १९/११/२०१४

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.किरण मोटे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

चिंचवड थेरगांव येथील बोट क्लबमधील उद्यानातील मनपाची व्यायामशाळा पिंपरी चिंचवड वॉटर स्पोर्टस् सेंटर या संस्थेस मनपाच्या अटी शर्तीनुसार ५ वर्षे चालविणेस देणेस तसेच सदर ठिकाणी बोटी ठेवण्यासाठी बाहेरील बाजूस शेड आहे ते शेड सुध्दा सदर संस्थेस वापरणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ८

दिनांक - १९/११/२०१४

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व साई संस्कार संस्था, चिंचवड पुणे १९ यांच्या सहकार्याने माहे डिसेंबर २०१४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद क्रीडांगण, महात्मा फुले नगर, चिंचवड येथे अपंग तसेच मानसिक अपंग विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५,६२,९००/- चे खर्चास मान्यता व सदर स्पर्धा अनुषंगाने विद्युत स्पीकर, माईक, जनरेटर व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग, फ क्षेत्रीय कार्यालय व स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च हा स्थापत्य विभाग, फ क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.४,१२,९००/- हा खर्च क्रीडा निधी वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ९

दिनांक - १९/११/२०१४

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.किरण मोटे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पिंपरी चिंचवड वॉटर स्पोर्टस् सेंटर, थेरगांव, पुणे - ३३. यांच्या सहकार्याने महापौर चषक राज्यस्तरीय कयाकिंग व कनीईंग बोट स्पर्धा २०१४-१५ माहे जानेवारी २०१५ या कालावधीत थेरगांव बोटक्लब, केजूदेवी बंधारा,

पवना नदी पात्र या ठिकाणी आयोजित करणेस तसेच सदरच्या स्पर्धा आयोजनाकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९३२/२०१४
दिनांक : २०/११/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 6.doc